From the house of
HOME CABLE
HOME NET

# होम टाइम्स
मराठी

साप्ताहिक शनिवार

FREE COPY

RNI No.: MAHMAR/2016/66872 | Post Reg. No. MNE/374/2019-21 | Volume IX | Issue 35 | Saturday, 25th Nov 2023 to 1st Dec 2023 | Price Rs5/-

www.hometimes.in www.facebook.com/hometimes.in www.twitter.com/hometimes_news hometimes.in write2us@hometimes.in

# मुदत उलटूनही मुंबईच्या प्रवेशद्वारावर सुविधांचा वानवाच

■ **होम टाइम्स टीम**

शासनाने जारी केलेल्या नियमांतर्गत मुंबईच्या प्रवेशद्वारावर कोणत्याही अतिरिक्त सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत, त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी असून या सुविधा लवकरात लवकर लागू करण्याचे आवाहन नागरिकांच्या वतीने करण्यात आले आहे.

१ ऑक्टोबरपासून मुंबईतील प्रवेशद्वारांवर लागू करण्यात आलेल्या टोलच्या दरात वाढ करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे मनसेचे कार्यकर्ते आक्रमक झाले असून, या टोलनाक्यांचे भाडे वाढल्याने मिळणाऱ्या सुविधांबाबत नाराजी दिसून आली. १२ ऑक्टोबरला मुख्यमंत्री आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याशी या विषयावर चर्चा झाली आणि १३ ऑक्टोबरपासून एक महिन्याचा अल्टिमेटम देण्यात आला. त्याअंतर्गत मुंबईच्या वेशीवर प्रशासनाकडून नागरिकांना अनेक सुविधा पुरविल्या जाणार होत्या.




**सरकारने जारी केलेल्या नियमांकडे टोलचालकांचे दुर्लक्ष**

सर्वप्रथम या पाच टोलनाक्यांवर टोल प्रशासनाकडून वसूल केल्या जाणाऱ्या टोलचे डिजिटल डिस्प्ले लावण्यात येणार होते. याशिवाय प्रसाधनगृह, रुग्णवाहिका सुविधा, अतिरिक्त पोलीस बंदोबस्त आणि वाहनांच्या हालचाली मोजण्यासाठी कॅमेरे बसविण्यात **(पान ३ वर)**

# मराठी पाट्या न लावणाऱ्यांवर कारवाई सुरू

## प्रति कामगार दोन हजारांचा आकारणार दंड

■ **होम टाइम्स टीम**

दुकाने, हॉटेल्स आणि संस्थांवर मराठी पाट्या न लावणाऱ्यांवर मुंबई महानगरपालिका दंडात्मक कारवाई सुरू करणार आहे. न्यायालयाने दिलेला अल्टिमेटम संपल्यानंतर आता महापालिकेने हा निर्णय घेतला आहे.

मुंबईतील दुकाने आणि संस्थांवर मराठी नावाचे फलक लावण्याचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. सुप्रीम कोर्टाने दुकानदारांना मराठी भाषेत फलक लावण्यासाठी २ महिन्यांची मुदत दिली होती. ज्याचा कालावधी २५ नोव्हेंबर २०२३ रोजी संपत आहे. मराठी पाट्या न लावणाऱ्या दुकानदारांवर पालिका कारवाई सुरू करणार आहे. त्याअंतर्गत प्रत्येक कर्मचाऱ्याला २ हजार रुपये दंड आकारण्यात येणार आहे. म्हणजेच एका दुकानात १० कर्मचारी काम करत असतील तर दुकानदाराला २० हजार रुपयांचा दंड ठोठावला जाईल. यावर पालिकेच्या अधिकाऱ्याने सांगितले की, या प्रकरणी यापूर्वी अनेक दुकानदारांना नोटिसा देण्यात आल्या होत्या. मात्र आता थेट कडक कारवाई करण्यात येणार आहे.

मुंबई शहर आणि उपनगरात ७ लाख दुकाने, हॉटेल्स आणि इतर आस्थापना आहेत. याआधी पालिकेने दिलेला इशारा दिला होता. त्यानंतर २३ हजार ४३६ दुकानदारांनी मराठी भाषेत फलक लावले तर ५ हजार २१७ दुकानदारांनी नोटीसकडे दुर्लक्ष केले. मुलुंडमधील बहुतांश दुकानांची नावे मराठी भाषेत आहेत. पण अजूनही अनेक दुकाने आणि संस्था आहेत ज्यांची नावे इंग्रजीत लिहिली आहेत. फेडरेशन ऑफ रिटेल ट्रेड वेल्फेअर असोसिएशनने नागरिकांनी दुकानांबाहेर लवकरात लवकर मराठी पाट्या लावण्याचे आवाहन केले आहे जेणेकरून मुंबई महापालिकेकडून होणाऱ्या कारवाईचा त्यांना सामना करावा लागणार नाही.

# स्लममधील महिलांसाठी फिरती व्यायामशाळा

## मुंबई उपनगरातून होणार मोहिमेची सुरुवात

■ **होम टाइम्स टीम**

***झोपडपट्टीतील महिलांचे आरोग्य लक्षात घेऊन मुंबई उपनगरात लवकरच मोबाईल जिम सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे बसेसचे जिममध्ये रूपांतर होणार आहे. या कामासाठी कंपनीचीही निवड करण्यात आली आहे.***

*मुंबईतील बदलत्या जीवनशैलीमुळे महिला अनेक आजारांना बळी पडत आहेत. त्यामुळे महिलांच्या आरोग्यावरही परिणाम होत आहे. हीच बाब लक्षात घेऊन मुंबई महापालिकेने महिलांसाठी मोबाईल जिमची संकल्पना आणली आहे. घरातील काम आणि इतर जबाबदाऱ्यांमुळे महिलांना त्यांच्या आरोग्याकडे लक्ष देता येत नाही.*

*यामुळे ही नवीन संकल्पना आणली आहे. येत्या काही महिन्यांत मुंबईतील झोपडपट्टी (स्लम) भागात या फिरत्या जिम बसवण्यात येणार आहेत, जेणेकरून झोपडपट्टी भागात राहणाऱ्या महिलांना त्यांच्या घराजवळ फिटनेस सुविधा मिळू शकेल.*

*बसेसमध्ये या फिरत्या जिमची रचना करण्यात येणार आहे. प्रथम उपनगरांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर मोबाइल जिमची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. पालिकेच्या योजनेनुसार, बसेस मोबाईल जिम म्हणून तयार केल्या जातील. मोबाईल जिमसाठी सुमारे ७५ लाख रुपये खर्च येणार असून येत्या तीन वर्षांसाठी त्याची देखभाल केली जाणार आहे. या कामासाठी बी द चेंज कंपनीचीही निवड करण्यात आली आहे. या बसमध्ये एक बस चालक, प्रशिक्षक आणि अन्य सहायकाचाही समावेश असेल. ही बस नियोजित वेळेवर उपनगरातील झोपडपट्ट्यांमध्ये जाणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या मोहिमेची संकल्पना तत्कालीन पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांची होती. आता या संकल्पनेला मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी चालना दिली असून त्यासाठी मंत्र्यांनी मुंबई महापालिका प्रशासनाला नवा प्रस्ताव दिला आहे. मंत्री लोढा यांच्या प्रस्तावानुसार जिमची रचना करण्यात येणार आहे.*

# डम्पिंगच्या समस्येतून मुंबईकरांची सुटका करण्यासाठी समिती स्थापन करा -मुख्यमंत्री

■ **होम टाइम्स टीम**

**डम्पिंग ग्राऊंडच्या समस्येतून मुंबईकरांना दिलासा देण्यासाठी नुकतीच राज्याचे मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्र्यांमध्ये चर्चा झाली. त्यामुळे या कचऱ्याने भरलेले डम्पिंग ग्राउंड मोकळे करण्यासाठी समिती स्थापन करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.**

मुंबई महापालिकेच्या अखत्यारीतील डम्पिंग ग्राऊंडचा मुद्दा पुन्हा एकदा तापला आहे. मुलुंड, कांजूरमार्ग आणि देवनार डम्पिंग ग्राऊंडच्या आसपास राहणाऱ्या नागरिकांनी मुंबईतील वाढत्या प्रदूषणाबाबत पुन्हा एकदा आवाज उठवला आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावतीने केंद्रीय नगरविकास मंत्री हरदीपसिंग पुरी आणि संबंधित अधिकाऱ्यांसोबत गुरुवारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक घेण्यात आली आणि त्यावर तोडगा काढण्याबाबत चर्चा करण्यात आली. मुंबईतील डम्पिंग ग्राऊंडवर साचणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी समिती नेमण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले असून, त्याचा कृती आराखडा आठवडाभरात सादर करण्यासही सांगण्यात आले आहे. या समितीमध्ये भारत सरकारचे सचिव, राज्याचे प्रधान सचिव, मुंबई आयुक्त आणि मुंबई पालिकेचे अतिरिक्त आयुक्त यांचा समावेश असेल. जे मुलुंड, कांजूरमार्ग आणि देवनार येथील डम्पिंग ग्राऊंडमधील हजारो टन कचऱ्याची आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्याचा अहवाल तयार करेल. मुलुंड, कांजूरमार्ग



### १०० मेगावॅट वीजनिर्मिती होणार

**मुंबईतील कांजूरमार्ग आणि देवनार डम्पिंग ग्राऊंडमध्ये ७००० मेट्रिक टन कचरा टाकला जातो. त्यामुळे सुमारे १०० मेगावॅट वीजनिर्मिती होऊ शकते. पहिल्या टप्प्यात देवनार डम्पिंग ग्राऊंडमधील या प्रकल्पातून ६०० मेट्रिक टन कचऱ्यापासून वीजनिर्मिती केली जाणार आहे. यामुळे दररोज ६ मेगावॅट वीज उपलब्ध होणार आहे. एवढेच नव्हे तर भविष्यात या प्रकल्पात १८०० मेट्रिक कचऱ्याचे रूपांतर करून वीजनिर्मिती करण्याचेही नियोजन आहे. जेणेकरून दररोज १० मेगावॅटपर्यंत वीजनिर्मिती करता येईल. कचऱ्यापासून निर्माण होणाऱ्या विजेचा काही भाग या प्लांटमध्ये वापरला जाणार आहे.**

तर डम्पिंग ग्राऊंडवरून कचऱ्याचे ढीग हटवावेत. मुंबईतील वाढती प्रदूषण पातळी कमी कांजूरमार्ग डम्पिंग ग्राउंडवर सरासरी ५५०० मेट्रिक टन कचरा टाकला जातो. यापैकी ५०० मेट्रिक टन ओल्या कचऱ्यावर विंडो कंपोस्टिंग तंत्रज्ञानाद्वारे प्रक्रिया केली जाते. तर ५०० मेट्रिक टन इंधन आणि ४५०० मेट्रिक टन इंधनावर बायोरिएक्टर तंत्रज्ञान वापरून प्रक्रिया केली जाते. मुलुंड टी वॉर्डबद्दल बोलायचे तर कांजूर मार्ग डम्पिंग ग्राउंडवर सरासरी १५५ मेट्रिक टन कचरा टाकला जातो. त्यापैकी २५ मेट्रिक टन ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते. २०११ मध्ये या कामासाठी अँटोनी लारा एजन्सीची नियुक्ती करण्यात आली होती. ज्यांचा कार्यकाळ २५ वर्षांनी संपणार आहे. या कचऱ्याचे कंपोस्ट करून खत बनवले जाते. मुंबई पालिकेने नागरिकांना सुका आणि ओला कचरा वेगळा करून आपला परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले आहे.

# मुलुंडमध्ये उत्साहात साजरा झाला छठ सण

■ होम टाइम्स टीम

मुलुंडसह देशभरात मावळत्या सूर्याला अर्घ्य अर्पण करून छठपूजेचा सण भक्तीभावाने साजरा करण्यात आला. दुपारपासूनच तलावांच्या काठावर भाविकांची व त्यांच्या कुटुंबीयांची गर्दी वाढली होती. ३६ तासांचा उपवास सोडल्यानंतर भाविकांनी छठमैयाचा नवस केला. मुलुंडमध्ये रविवारी आयोजित छठपूजेला मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थिती नोंदवली होती.

सूर्य उपासनेचा महान सण म्हणून ओळखला जाणारा छठ पूजा सण रविवारी मुंबईत मोठ्या भक्तीभावाने साजरी करण्यात आला. छठपूजेच्या तिसऱ्या दिवशी रविवारी सायंकाळी तलावांच्या पाण्यात उभे राहून मावळत्या सूर्याला अर्घ्य अर्पण करताना भाविक दिसले. मुलुंड पूर्वेला मोरया तलावातही असेच दृश्य पाहायला मिळाले. गेल्या १३ वर्षांप्रमाणे याही वर्षी मुलुंड



छठ पूजा समितीच्या वतीने मुलुंड पूर्वेला असलेल्या मोरया तालब येथे भाविकांसाठी अर्घ्याचे आयोजन करण्यात आले होते. छठवरती मुलुंड व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने तलावात उपस्थित राहून मावळत्या सूर्याला अर्पण करताना दिसत होते. यावेळी ईशान्य मुंबईचे खासदार मनोज कोटक, मा. नगरसेविका समिता कांबळे, मा. नगरसेविका रजनी केणी यांच्यासह इतर मान्यवरांनी उपस्थिती नोंदवली होती. एवढेच नव्हे तर यंदा मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थिती नोंदवली होती. संपूर्ण उत्सवादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मुलुंडमधील मौर्य तलाव व परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### छठ पूजा का साजरी केली जाते?

**हिंदू मान्यतेनुसार, महाभारत काळापासून छठ उत्सव सुरू झाल्याची कथा प्रचलित आहे. या उत्सवाची सुरुवात सर्वप्रथम सूर्यपुत्र कर्णाने सूर्याची पूजा करून केली. असे म्हटले जाते की कर्ण हा भगवान सूर्याचा महान भक्त होता आणि तो दररोज तासनतास पाण्यात उभा राहून त्याला अर्घ्य देत असे. सूर्याच्या कृपेनेच तो महान योद्धा झाला. आजही छठाच्या वेळी अर्घ्य देण्याची तीच परंपरा प्रचलित आहे.**

# मुलुंडमध्ये वीज कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करणाऱ्या दोघा भावांवर गुन्हा दाखल

■ होम टाइम्स टीम

**महावितरण कडून वीज बिलाची थकबाकी करणाऱ्या ग्राहकांवर मोठ्या प्रमाणात कारवाई केली जात आहे. मुलुंडमध्ये घरोघरी जाऊन सोळा दिवसांपेक्षा जास्त वीज बिल बाकी असलेल्या ग्राहकांवर वीज कनेक्शन बंद करण्याची कारवाई सुरू आहे. अशी कारवाई सुरू असताना मुलुंड पूर्वेकडे महावितरणाच्या अधिकाऱ्यांना शिवीगाळ करून त्यांना त्यांचे कर्तव्य बजावण्यापासून रोखण्यात आले.**

**मुलुंड महावितरण कडून सध्या विज चोरांवर नजर ठेवून त्यांच्यावर कारवाई करण्याची मोहीम सुरुआहे. यासोबतच विज बिल न भरणाऱ्या ग्राहकांवर देखील वीज पुरवठा खंडित करण्याची कारवाई केली जात आहे.**

**मुलुंड मध्ये मुलुंड पूर्व कडे चिंतामणराव देशमुख उद्यान परिसरामध्ये साईनाथ सोसायटी परिसरात वीज थकीत बिल न भरणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या महावितरणाच्या कर्मचाऱ्यांना शिविगाळ करून दोघा भावांनी त्यांना कारवाई करण्यापासून रोखले. त्यामुळे महावितरणाच्या कर्मचाऱ्यांनी दोघा भावांच्या विरोधात नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखलकेला आहे. दोघांवरही सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल झाला आहे. सचिन बोराडे आणि विजय बोराडे अशी त्या दोघांची नावे आहेत.**

## मुदत उलटूनही मुंबईच्या प्रवेशद्वारावर सुविधांचा वानवाच

(पान १ वरून)

येणार होते. मात्र शासनाने दिलेले नियम आणि अल्टिमेटम संपूनही या टोलनाक्यांवर हा प्रकार होताना दिसत नाही. मुलुंड पूर्व आणि पश्चिम असे तीन टोलनाके आहेत. त्यापैकी मुलुंड पश्चिम एलबीएस रोडवर डिजीटल डिस्प्ले बसवण्यात आला असून स्वच्छतागृहाचीही सुविधा उपलब्ध आहे मात्र या टोलनाक्यावर रुग्णवाहिकेची सुविधा दिसत नाही. तर मुलुंड पूर्व टोल नाका परिसरातही रुग्णवाहिका व डिजिटल डिस्प्ले बसविण्यात आलेला नाही. ऐरोली टोलनाक्यावरही असेच दृश्य पाहायला मिळाले, एवढेच नाही तर येथे अतिरिक्त पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आलेला नाही. यासह अनेक वेळा या टोलनाक्यांच्या आवारात वाहनांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळतात, मात्र या सर्व टोलनाक्यांपासून ३०० मीटर अंतरावर पिवळे पट्टे लावण्यात आले आहेत.

मुंबईचे प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या टोलनाक्यांवर प्रदूषण नियंत्रणासाठी प्रशासनाकडून स्प्रिंकलर यंत्रेही बसवण्यात येणार होती. मात्र तेही अद्याप पूर्ण झालेले नाही. वास्तविक, मुंबईत येणारी वाहने धुता यावीत, हाच यंत्र बसवण्याचा उद्देश होता. त्यामुळे प्रदूषण कमी होऊ शकते. मात्र, मुलुंडच्या हद्दीतील टोलनाक्यांवर अशी कोणतीही सुविधा सुरू झालेली नाही. सरकारने जारी केलेल्या नियमांची अंमलबजावणी सरकारच करताना दिसत नसल्याचे या चित्रांवरून स्पष्ट होत आहे. महिनाभरापूर्वी जारी केलेल्या नियमांकडे अशाप्रकारे दुर्लक्ष होत असल्याने येत्या पावसाळ्यात रस्त्यांची दुरवस्था झाल्यास नागरिकांच्या त्रासाला जबाबदार कोण, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

Volume : IX | Issue : 35 होम टाइम्स

## संपादकीय ■ हेमांशू कोठारी

# रस्ते धुवायचे पण कशाने?

देशाची राजधानी दिल्ली आहे, तर महाराष्ट्राची राजधानी मुंबई. पण महाराष्ट्राची राजधानी जरी मुंबई असली तरी तिची आर्थिक उलाढाल पाहता तिला देशाची आर्थिक राजधानी देखील म्हटले जाते. असे या दोन्ही राजधानींना मोठे महत्व आहे. पण हे जरी खरे असले तरी या दोन्ही राजधान्या आज प्रदूषणाच्या बाबतीत आघाडीवर आहेत. या राजधान्यांनी प्रदूषणाच्या नियमांची ऐसी की तैसी केल्याने देशासाठी महत्वाची मानली जाणारी ही शहरे आता वाढलेल्या प्रदूषणामुळे लोकांसाठी जीवघेणी ठरली आहेत. या शहरांची हवा डेंजर झोनमध्ये आली आहे. त्यामुळे लोकांच्या आरोग्यासाठी विशेषत: लहान मुले, जेष्ठ आणि आजारी नागरिकांच्या जीवाला त्यामुळे जास्त धोका निर्माण झाला. हवेतील प्रदूषणाबाबत सध्या मुंबई दिल्लीच्या मागे असली तरी मुंबईत ज्या गतीने वातावरणातील हवा प्रदूषित होत आहे पाहता मुंबई यात कधी दिल्लीच्या पुढे जाईल हे सांगता येणार नाही. अनेकदा तसा तिने दिल्लीच्या पुढे जाण्याचा प्रयत्न देखील केला आहे. मुंबईची प्रदूषण पसरविण्याची ही गती पाहता तिला त्याच गतीने आणि मोठ्या प्रमाणात आळा घालण्याची गरज आहे. ही गरज पाहता राज्य सरकारने अनेक पाऊले उचलली आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील यासाठी अग्रेसर आहेत. मुंबई महापालिका आयुक्तांना त्याबाबतचे आदेश देऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आयुक्त इकबाल सिंह चहल यांना कामाला लावले आहे. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आदेशानुसार आयुक्त चहल यांनी मुंबई भरातील सगळ्या वॉर्डांमध्ये हवेतील प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष पथके निर्माण केली आहेत. बंद करण्यात आलेली क्लीन अप मार्शल योजना कार्यान्वयीत करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार हे मार्शल आता हवेत प्रदूषण पसरविणाऱ्यांवर नजर ठेवणार आहेत, प्रदूषण करणाऱ्यांना कायदेशीर आर्थिक दंड ठोठावणार आहेत, तर बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी जाऊन पालिकेचे विशेष पथक पाहणी करून विकासकांना तशी तंबी देणार आहेत. यासाठी मुंबईचे उच्च न्यायालय देखील पुढे आले आहे. दिवाळीतही या न्यायालयाने चांगली भूमिका बजावली होती. फटाके फोडणाऱ्यांना अवघ्या दोन तासांचा अवधी देऊन फटाक्यांमुळे हवेत मोठ्या प्रमाणात पसरणाऱ्या प्रदूषणाला रोखण्यास न्यायालयाने हातभार लावला आहे. या काळात पोलिसांनाही न्यायालयाने दिलेल्या आदेशाची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला आहे. मुलुंडसह मुंबईभर पोलिसांनी नियमबाह्य फटाके विकणाऱ्या आणि फोडणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली आहे. सध्या पालिकेची अधिकारी देखील प्रत्येक वॉर्डात फिरून प्रदूषण पसरविणाऱ्यांवर लक्ष ठेवले जात आहे. बांधकामांच्या ठिकाणी जाऊन विकासकांना त्या ठिकाणी जाळी लावण्यास सांगितले जातेय, पाण्याने रस्ते धुण्याचे आदेश दिले जातात. हवेतील प्रदूषण कमी व्हावे म्हणून स्प्रिंकल यंत्रणा बसविण्याचे आदेश दिले जातात. आता नागरी सोसायट्यांमध्येही कोणी कचरा जाळत आहेत का, यावर लक्ष ठेवले जातेय. हवेतील प्रदूषण रोखण्यासाठी या उपाय योजना करणे गरजेचेच आहे, पण त्या कुठे आणि कशा उपलब्ध होतील याबाबत पालिका प्रशासनाने पाऊले उचलायला नकोत का? रस्ते आणि चौक पाण्याने धुवायचे असतील तर एवढे पाणी येणार कुठून? आधीच यंदा पाऊस कमी झालाय, त्यामुळेपाणी जपून वापरण्याचे पालिकेचे आदेश आहेत, शिवाय पाण्याचे दरही परवडणारे नाहीत. मग अशावेळी धुळीने माखलेले रस्ते धुवायचे कसे? असे रास्त प्रश्न आदेश काढण्याआधी पालिका प्रशासनासमोर उभे राहत नाहीत का? विकासक, सोसायट्यांमधील नागरिक, वाहनचालक आणि नागरिक यांना मात्र असे प्रश्न पडलेले आहेत. आता त्याचे उत्तर पालिका प्रशासन आणि इतर जबाबदार यंत्रणांनी द्यायचे आहे.

# विश्वचषकाचा अंतिम सामना गमावल्याने मुलुंडकरांमध्ये नाराजी





## भारतीय खेळाडूंचे मनोबल वाढवण्यासाठी केले होते होम हवन आणि स्क्रिनिंग

■ होम टाइम्स टीम

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील विश्वचषक सामन्याचे स्क्रिनिंग मुलुंडमध्ये आयोजित करण्यात आले होते. जिथे मोठ्या संख्येने क्रिकेटप्रेमी नागरिकांधून खेळाडूंचे मनोबल वाढवताना दिसले. मात्र, ऑस्ट्रेलियाने विश्वचषक जिंकल्याने उत्साही भारतीय क्रिकेट चाहत्यांमध्ये नाराजी पाहायला मिळाली.

रविवारी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर वर्ल्ड कपचा शेवटचा सामना पार पडला. याबाबत भारतीयांमध्ये उत्साह होता. भारतीय खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी अनेक ठिकाणी ओम हवनाचे आयोजन करण्यात आले होते आणि अनेक ठिकाणी या सामन्याचे थेट स्क्रिनिंग आयोजित करण्यात आले होते. या शेवटच्या सामन्याचे स्क्रिनिंगही मुलुंडमध्ये अनेक ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. मुलुंड येथील कालिदास नाट्यगृह येथे युवा प्रेरणा फाउंडेशनतर्फे भारत आणि ऑस्ट्रेलिया सामन्याचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. या ठिकाणी ईशान्य मुंबईचे खासदार मनोज कोटक, मुलुंडच्या माजी नगरसेविका समिता कांबळे यांच्यासह लहान मुलांपासून वृद्ध नागरिकांपर्यंत सर्वांनी आणि सर्व क्रिकेटप्रेमींनी उपस्थिती नोंदवली होती. मुलुंडमधील कालिदास नाट्यगृहाशिवाय इतरही अनेक ठिकाणी या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. जिथे नागरिक आणि इतर क्रिकेटप्रेमींनी आपली उपस्थिती नोंदवली आणि भारतीय खेळाडूंचे मनोबल वाढवले. मात्र, २०२३ चा विश्वचषक ऑस्ट्रेलियाने जिंकल्याने क्रिकेट चाहत्यांमध्ये नाराजी होती.

# मुलुंड पूर्वेतील पीइपी प्रकल्पामुळे सामाजिक सलोखा बिघण्याची नेत्यांना वाटतेय भीती

## ४५०० हजार घरांच्या प्रकल्पाला मुलुंडकरांचा विरोध

■ **होम टाइम्स टीम**

मुलुंडमध्ये मुलुंड पूर्व परिसरात सुरू असलेल्या पीइपी प्रकल्पामध्ये ४५०० घरांचा समावेश असणार आहे. परंतु हा प्रकल्प सध्या वादात सापडला आहे. तत्कालीन सरकारने आर्थिक फायद्यासाठी हा प्रकल्प रेटून नेला असून या प्रकल्पामुळे मुलुंडचे सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक खच्चीकरण होणार असल्याचा आरोप नेते मंडळींकडून केला जात आहे.



मुलुंड पूर्वेकडील केळकर महाविद्यालय परिसरामध्ये ४५०० घरांच्या प्रकल्पाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. परंतु हा प्रोजेक्ट पूर्णत्वास घेण्याआधीच वादाच्या भौऱ्यात सापडलेला आहे. या प्रोजेक्ट अंतर्गत एमएमआरडीए सोबतच मुंबई महानगरपालिकेच्या विविध विकासकामांतर्गत प्रकल्प बाधित कुटुंबांना स्थलांतरित केले जाणार आहे. यासाठी हा प्रोजेक्ट सुरू आहे. परंतु या प्रोजेक्टमध्ये मुलुंड मधील प्रकल्प बाधित कमी आणि मानखुर्द बेहराम पाडा, बैंगन पाडा, शिवाजीनगर, गोवंडी या ठिकाणचे प्रकल्प बाधित मोठ्या प्रमाणात विस्थापित होणार आहेत. एकूण ४०,००० लोक वस्ती या ठिकाणी होणार असल्यामुळे मुलुंडचे सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक खच्चीकरण होण्याची भीती नेत्यांकडून व्यक्त केली जात आहे. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडली. सोबतच या प्रकल्पामुळे केवळ धार्मिक सलोखाच बिघडणार नसून यामध्ये मोठा भ्रष्टाचारही असल्याचा देखील आरोप केला आहे. ज्या विकासाला हा प्रोजेक्ट तयार करण्यासाठी दिला आहे, त्या विकासाकाला मुंबई महानगरपालिकेकडून कवडी मोलात जमीन देण्यात आली आहे. यासोबतच ३००० कोटींचा फायदा विकासाला पालिका प्रशासनाकडून करून दिला जात आहे. असा आरोप सोमय्या यांनी केला आहे. या संदर्भात मुलुंड नवघर पोलीस ठाण्यात सविस्तर तक्रार अर्ज देखील दाखल करण्यात आला आहे. मुलुंड पूर्वे कडील नागरिकांमध्ये देखील या प्रकल्पामुळे दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रकल्पाच्या ठिकाणी रात्री उशिरापर्यंत कामे सुरू असल्याच्या तक्रारी देखील मुलुंड पोलीस ठाण्यात प्राप्त झाल्या आहेत. तसेच हा प्रकल्प होऊ नये अशी मागणी 'मी मुलुंडकर संस्थे'चे राहुल बाणवली यांनी देखील केली आहे. एकंदरीतच नागरिकांकडून देखील या प्रकल्पाला विरोध होतोय, तर दुसरीकडे राजकीय पातळीवरून देखील या प्रकल्पाला विरोध केला जातोय. यावरून मुलुंडचे राजकारण भविष्यातबिघडण्याची चिन्हे दिसून येत आहेत.

# २०२३-२०२४ मध्ये पाण्याच्या दरात वाढ होणार नाही



## मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर महापालिकेच्या निर्णयाचा यू-टर्न

■ **होम टाइम्स टीम**

दरवर्षीप्रमाणे यंदाही पाणी दरात आठ टक्के वाढ करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानंतर रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

दरवर्षी मुंबई पाहापालिका पाण्याच्या दरात ८ टक्क्यांनी वाढ करते. मुंबई महापालिकेला जनतेला पाणी देण्यासाठी अनेक प्रकारचा खर्च करावा लागतो. पाणीपुरवठ्यासाठी प्रशासकीय खर्चाव्यतिरिक्त ऊर्जा खर्च आणि सरकारी तलावातून घेतलेल्या पाण्यावरील खर्चही वाढला आहे. त्याचप्रमाणे शुद्ध पाणी आणि त्यात टाकण्यात येणारी औषधे यांचा खर्चही वाढला आहे. त्याअंतर्गत २०१२ साली महापालिकेने पाणी दरवाढीचा प्रस्ताव मांडला होता. यंदा येथील निर्णयाचा अंतिम निर्णय १ डिसेंबर रोजी होणार होता. मात्र त्यापूर्वीच हा निर्णय फेटाळण्याच्या सूचना राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या वतीने महापालिका आयुक्त चहल यांना देण्यात आल्या होत्या. या निर्णयामुळे आता नागरिकांना २०२३-२०२४ या वर्षासाठी पाण्यासाठी जास्त पैसे मोजावे लागणार नाहीत. यामुळे एकीकडे सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळाला असतानाच दुसरीकडे राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाकडे राजकीय दृष्टिकोनातूनही पाहिले जाऊ लागले आहे.

# ‘त्या’ सायकल ट्रॅकसाठी पुन्हा होणार कोट्यवधींचा खर्च

■ होम टाइम्स टीम

**मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांच्या शेजारीच्या झोपड्या हटवून त्या परिसरात सायकल ट्रॅकसह बांधण्यात आलेल्या फुटपाथची दयनीय अवस्था झाल्याचा प्रकार समोर आला आहे. प्रायोगिक तत्वावर बांधण्यात आलेल्या या प्रकल्पाची निगा न राखल्याने त्याची ही अवस्था झाली आहे. आता पुन्हा एकदा त्यावर कोट्यवधींचा खर्च करून हा ट्रॅक आणि फुटपाथ दुरुस्त केला जाणार असला तरी त्याचा नाहक खर्च लोकांच्या खिशातून होणार असल्याने त्याबाबत त्यांच्यात असंतोष पसरल्याचे दिसतेय.**



## प्रशासनाच्या चुकीचा नागरीकांना भुर्दंड

जलवाहिन्यांचा परिसर अतिक्रमण मुक्त होऊन त्या जागेचा मुंबईकरांचे आरोग्य सुधारण्यासाठी व्हावा या उद्देशाने मुंबई महानगर पालिकेने त्या परिसरातील अतिक्रमणे हटवून तेथे सायकल ट्रॅकसह फुटपाथ आणि सर्व्हिस रोड, उद्यान विकसीत केले. मुलुंड भागातील जलवाहिनीच्या जवळची बांधकामे हटवून अशाचप्रकारे महापालिकेने प्रायोगिक तत्वावर सायकल ट्रॅक उभारले होते. मात्र त्यांची निगा न राखल्या गेल्याने सात ते आठ वर्षांपूर्वी बनवलेल्या प्रायोगिक तत्वावरील प्रकल्पाच्या सायकल ट्रॅकच्या रस्त्यावरच खड्डे पडून या भागाची दुरावस्था झाल्याचे पहायला मिळत आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार महापालिकेने जलवाहिनी लगतच्या झोपड्या तथा बांधकामे हटवून जलवाहिनी अतिक्रमण मुक्त केल्या. त्यामुळे या मुख्य जलवाहिनीच्या परिसरात महापालिकेच्यावतीने हरितवारी जलतीरी या प्रकल्पांतर्गत सायकल ट्रॅक, पदपथ, सेवा रस्ता, उद्याने आदी विकसीत करण्यात आले. मुलुंड येथील मुख्य जलवाहिनीलगत १.१४० किमी लांबीचा पट्टा प्रायोगिक तत्वावर विकसीत करण्याचा निर्णय घेऊन या प्रकल्पाचे काम सन २०१६-१७मध्ये पूर्ण केले. परंतु सात ते आठ वर्षांपूर्वी बनवलेल्या या सायकल ट्रॅकचे बांधकाम डांबरी केल्याने या रस्त्यावर विविध ठिकाणी खड्डे पडले आहेत. तर काही ठिकाणी असमान पृष्ठभाग झाला आहे. त्यामुळे या पायलट प्रकल्पातील रस्त्याचे पुनर्पृष्ठिकरण व दुरुस्ती करणे आवश्यकता भासू लागली आहे. या रस्त्याची दुरावस्था झाल्याने नागरिकांना होणाऱ्या या गैरसोयीमुळे या सायकल ट्रॅकच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येत आहे. या कामांसाठी आता विविध करांसह चार कोटी रुपये खर्च केले जाणार आहे. त्यासाठी शंखेश्वर एंटरप्रायझेस या कंपनीची निवड करण्यात आली असल्याची माहिती मिळत आहे.

मुंबईतील अंतर्गत वाहतुकीला एक नवा पर्याय देणाऱ्या ३९ किमी लांबीच्या सायकल ट्रॅकच्या चार पैकी पहिल्या दोन टप्प्याच्या कामाला २०१८मध्ये सुरुवात झाली होती. त्यामुळे मुंबईकरांना सायकलने मुलुंडहून धारावीला किंवा घाटकोपरहून शीव परिसरात जाऊ शकतील असा दावा महापालिका प्रशासनाने केला होता. मुलुंडचा सायकल ट्रॅक सुध्दा याच हेतूने बनविण्यात आला होता. मात्र या सायकल ट्रॅकचा वापर म्हणावा त्या प्रमाणात होत नसल्याने या सायकल ट्रॅकवर केलेला सर्व खर्च वाया गेल्याचे आरोपही होत आहे. त्यामुळेच काही सायकल ट्रॅकचे प्रकल्प महापालिकेने गुंडाळले आहेत. मात्र या कामांची वेळेत निगा न राखली गेल्याने त्यांची दुरुस्ती होणार आहे, त्याचा नाहक खर्च नागरिकांच्या माथी पडणार असल्याने त्याबाबत त्यांच्या असंतोषाचे वातावरण पसरले पाहायला मिळत आहे.

# भांडुपमधील शाळेच्या मुख्याध्यापकावर विनयभंगाचा गुन्हा दाखल

## समन्वयकाचे काम करणाऱ्या महिलेला छेडल्याचा मुख्याध्यापकावर आरोप

■ होम टाइम्स टीम

शाळेत समन्वयकाचे काम करणाऱ्या महिलेचा तेथील मुख्याध्यापकडून छळ झाल्याचा प्रकार घडला आहे. याबाबत भांडुप पोलिसांनी विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ४८ वर्षीय महिला जून २०२३ पासून भांडुप येथील एका नामांकित शाळेत समन्वयक म्हणून कार्यरत होती. शाळेचे मुख्याध्यापक तिला सतत नको त्या आशयाचे संदेश पाठवत होते. तसेच जेव्हा जेव्हा पीडित मुख्याध्यापकाच्या आसापास असायची तेव्हा तेव्हा मुख्याध्यापकाकडून महिलेला अनुचित हावभाव देखील केले जात होते. याबाबत पीडित महिलेने शाळेच्या एचआरकडे तक्रारही केली होती. परंतु त्यावर त्यानंतर पीडितेला नोव्हेंबर महिन्यात कामावरून काढून टाकण्यात आले. त्यानंतर तिने भांडुप पोलीस ठाणे गाठले आणि मुख्याध्यापकावर गुन्हा दाखल केला. भांडुप पोलिसांनी भादंवि कलम ३५४ व ५०४ अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# भुरट्या चोरांनी वाटसरूला लुटले

## नवघर पोलिसांनी चार जणांना केली अटक

■ होम टाइम्स टीम







वाटसरूला लुटणाऱ्या चौकडीला नवघर पोलिसांनी अटक केले आहे. मुलुंडमधून जाणाऱ्या गोरेगाव जोड रस्त्यावर पहाटे ही घटना घडली होती. पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे गुन्ह्याचा तपास केला आणि आरोपींना अटक केली.

नवघर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ज्ञानदेव कदम हे भांडुप येथील रहिवासी आहेत. १५ नोव्हेंबर रोजी पहाटे ते काम आटोपून मुलुंड गोरेगाव लिंक रोड मार्गे घरी जात होते. तेव्हा त्यांच्या मागे दोन लोक येत असल्याचे दिसले. ते दोघेही चोर असल्याचा संशय त्यांना आला. त्यामुळे त्यांना पाहून ज्ञानदेव पळू लागले. ते पळत असतानाच त्यांच्या समोर आणखी चार जण आले. त्यातील तिघांनी ज्ञानदेवला पकडून एकाने त्यांच्या गळ्यातील सात ग्रॅम वजनाची सोनसाखळी काढून घेतली. एवढेच नाही तर पाठलाग करणाऱ्या दोघांनी त्याच्या हातातील घड्याळही काढून घेतले. यानंतर हे सर्व जण टेम्पोमध्ये बसून सोनापूर सिग्नलच्या दिशेने निघून गेले. याप्रकारानंतर ज्ञानदेवलने नवघर पोलिस ठाण्यात जाऊन घटनेची माहिती दिली आणि गुन्हा दाखल केला. नवघर पोलिसांनी अज्ञातांविरुद्ध भादंवि कलम ३९५ अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. तांत्रिक तपासाच्या आधारे याप्रकरणी ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. झीशान शिद्दीकी, अली राजा उर्फ छोटे मियाँ, मोहम्मद अजगर अली अशरफ खान, मुसर मोहम्मद मुस्ताक अली खान अशी या चार आरोपींची नावे आहेत. या सर्व आरोपींची चौकशी करून त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.



जसराज ॲन्टिक ®

सरोज गड़ा (मुलुंड-पूर्व) (राईधणजर/गडशीशा)
सणासाठी विशेष ऑफर
10% to 40% डिसकाउंट
१ ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांमध्ये अनेक नवीन डिझाईन्स उपलब्ध
नेत्रदीपक आणि आकर्षक डिझाईन जे मूळ दागिन्यांनाही फिके पाडेल + कुंदन + नेकलेस सेट
पेंटेड ब्युटी लाँग सेट + चंदनहार + दागिने + जवपतला गोल्ड + रोडियम ब्रेसलेट + चेन
आणि अनेक प्रकारचे आलिशान आणि आकर्षक दागिने
जुन्या आणि नवीन सर्व ग्राहकांचे स्वागत आहे
नागरिकांचा विश्वास म्हणजे जसराज ॲंटिकची खास ऑफर
सणाच्या ऑफरवर १०% ते ४०% सूट
Note: Before coming pl buzz on Cell.
CONTACT : GIRISH GADA - 9821376756 SAROJ GADA - 9821854370

# Helpline

## सिटीजन रिपोर्टर
78956 78956

## होम केबल
022 - 6614 6060

## होम नेट
022 - 6621 1333
customerservice@homenet.net

## होम टाइम्स
022 - 6614 6050
write2us@hometimes.in

## होम टाइम्स आणि होम केबलवर जाहिरात द्या
78957 78957
homecableads@gmail.com

योग्य माहितीसाठी कृपया संबंधित नंबरांवरच संपर्क करा


## जाहिरातींबाबत महत्त्वाची सूचना

साप्ताहिक होम टाइम्समधून जाहिरातदारांच्या विविध प्रकारच्या जाहिराती प्रकाशित केल्या जातात. या जाहिरातीतील मजकुराबाबत सर्वस्वी जबाबदारी जाहिरातदारांची असून त्याबाबत उद्‌भवणाऱ्या कायदेशीर वा अन्य प्रकरणात साप्ताहिक होम टाइम्सचे व्यवस्थापन, मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक यांच्यासह कोणीही जबाबदार असणार नाही. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.


– मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक



आरोग्य आशा
डॉ. मोनिषा रावत

# 'सुजोक'

# टेम्पोरोमोडिब्युलर जॉइंट डिसऑर्डर/रोग





### औषधाशिवाय नैसर्गिक पद्धतीने उपचार

**वेळेवर उपचार न केल्यास जबड्याचा बिंदू/स्थान, दात अथवा चावा घेतल्यास कायमस्वरूपी बदल होऊ शकतात.**

*हा आजार जबडा दुखण्याचे मुख्य कारणांपैकी एक आहे, जागतिक स्तरावर लाखो लोक या आजाराने ग्रस्त आहेत.*

### टेम्पोरोमोडिब्युलर संयुक्त रोगात काय होते?

*टेम्पोरोमॅन्डिब्युलर जॉइंट हा सांधा आहे जो खालच्या जबड्याला कवटीच्या टेम्पोरल हाडाशी जोडतो. या सांध्यामुळे जबडा नियमित चेहऱ्याच्या हालचाली जसे की बोलणे, हसणे आणि चघळणे यासारखे कार्य करू देते. हा आजार तेव्हा होतो जेव्हा या सांध्याला सूज येते किंवा खराब होते, परिणामी कान, चेहरा, जबडा, मान दुखणे, कडकपणा/जडपणा आणि कवटी उघडण्यास आणि बंद करण्यात अडचण येते.*



### सामान्य कारण

- दंत समस्या
- दात घासणे आणि पिळणे
- संधिवात
- दुखापत
- कानात संसर्ग
- लाळ ग्रंथींचे रोग
- तणाव, डोकेदुखी

*आमच्या 'मोनिषाज मंत्रा' मध्ये आम्ही रुग्णांना त्यांच्या जबड्याच्या दुखण्यापासून मुक्त होण्यासाठी खालील प्रकारे मदत केली आहे.*

### उपचार

- काही दैनंदिन क्रियाकलाप टाळा ज्यामुळे सूजलेल्या किंवा खराब झालेल्या टेम्पोरोमोडिब्युलर जॉइंटवर दबाव येऊ शकतो जसे की दात घासणे आणि घट्ट करणे, संधिवात, च्युइंगम चघळणे किंवा कडक/कठीण पदार्थ खाणे.
- शरीराची योग्य स्थिती राखणे, कारण खराब आसनामुळे जबडा आणि मान यांच्या स्नायू आणि सांध्यांवर दबाव येऊ शकतो.
- स्मित ध्यान आणि योग–प्राणायाम यांसारख्या रिलेक्शशन टेक्निकने तणाव कमी करणे, कारण सतत तणावामुळे जबड्याच्या स्नायूंमध्ये तणाव निर्माण होऊ शकतो.
- सूज कमी करण्यासाठी दाहक–विरोधी गुणधर्मांनी भरपुर असलेल्या पदार्थांचे सेवन करणे.

## सुजोक थेरपी

**(सूज कमी करण्यास, रक्त परिसंचरण वाढविण्यास आणि नैसर्गिक पेनकिलर–एंडॉर्फिन सोडण्यास मदत करते)**

- हाताच्या बोटाच्या थंबनेल सभोवतालच्या जबड्याच्या वेदनादायक क्षेत्रास नियमितपणे, दिवसातून ३–४ वेळा, एका मिनिटासाठी डायगनोस्टिक प्रोब अथवा बोटांनी मालिश करणे. (चित्र १ प्रमाणे)







- हाताच्या बोटावर जबड्याशी संबंधित वेदनादायक भागावर/जागाला चिकट टेपवर तीन मुगाचे दाणे लावणे. (चित्र २ प्रमाणे)

**आंतरराष्ट्रीय सुजोक असोसिएशन (ISA) प्रमाणित कार्यशाळेचे वेळापत्रक :**
**१. ऑनलाईन सुजोक–बेसिक** (Level-I) २९/११/२३ ते ८/१२/२०२३, **२. निवासी मेरिडियन–सुजोक** Ki (Level-II) ०९/१२/२३ ते ११/१२/२०२३, **३. ऑनलाइन मेरिडियन सुजोक**–Ki (Level-II) १८/१२/२३ ते २८/१२/२०२३, **४. निवासी – सुजोक** Six Ki-1 (Level-III) ८/४/२०२४ ते १३/४/२०२४, •Limited Seats Registration on First Cum First Basis.

**Dr.Monisha Rawat - Founder of 'Monisha's Mantra', Mumbai and Global We Care Foundation -**
M.Sc., M.D. (Alternative Medicine), Life Coach, Master in Sujok, Consulting Nutritionist, Corporate Trainer, Holistic Counselor, Sujok Diabetes Specialist, International Lecturer for Sujok & Smile Taiji. ISA Authorized Lecturer for SUJOK Level - I, II, III & IV Award Winner as a BEST PERFORMING TEACHER by International Sujok Association (ISA) – SIC 2019 • National Excellence Health Award - 2019 During COVID-19 • Award winner of International Women Excellence Empowerment Award (WEE) – 2020 as a RISING STAR • Award winner of India Best Therapist Award for the Year 2021 by MKSS • Award Winner of ET CHANGE MAKER-2022 for Health & Wellness powered by Economic Times-Ascent & Navbharat Times
Award winner of PILLAR OF MAHARSHTRA AWARD-2022, in Association with MahaSEWA.
**An ISO Certified Centre at Mumbai Mulund- +91 8655139777/ 9029960086, Goregaon - +91 8433947592 / 9820343592**





# आरोग्य आणि मनोरंजन


## टॅरो कार्ड वाचन भविष्य आणि सल्ला

**२५ नोव्हेंबर २०२३ ते १ डिसेंबर २०२३**


*सुनिता देसाई २००३ पासून टॅरो रिडींग करतात. ग्रँड मास्टर इन रेकी, फोर लेव्हल्स इन चक्रा मेडिटेशन, मास्टर्स इन मरमा, जीपी इन शियात्सू, क्रिस्टल अँन्ड पिरॅमिड एक्स्पर्टस, मास्टर्स इन अॅक्युप्रेशरीस्ट, अरोमा थेरपिस्ट, प्रानीक हिलर, औरा हिलर आणि व्हर्च्यू पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटवर दोन पुस्तके लिहिली आहेत. जे गुजराती माध्यमिक शाळेत शिकवले जाते.*
*संपर्क : ९३२३४३०३५५ e-mail : desaisunita02@gmail.com*




**■ मेष** (अ, ल, इ)
तुम्ही योग्य निर्णय घेऊ शकणार नाही आणि त्यासाठी तुम्हाला त्रास होईल. **सल्ला :** या आठवड्यात कोणत्याही पवित्र स्थळाला भेट द्या. निळ्या रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या निर्णयांकडे लक्ष द्या.





**■ वृषभ** (ब, व, य)
तुम्ही काही मुद्द्यांवर मजबूत व्हाल आणि तुमच्या बाजूने निर्णय घ्याल. **सल्ला :** बोलण्यापूर्वी दोनदा विचार करा. गुलाबी रंगाच्या वस्तू वापरा. तुमच्या वैश्विक ऊर्जेकडे लक्ष द्या.




**■ मिथुन** (क, च, ज)
तुमची मत्सर फक्त तुमचे हृदय तोडेल आणि आधार मिळणार नाही. **सल्ला :** कोणावरही अन्याय करण्याचा प्रयत्न करू नका. लाल रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या रागाकडे लक्ष द्या.




**■ कर्क** (ड, च, ह)
काही गोष्टी तुमच्या इच्छेनुसार घडणार नाहीत पण तुम्हाला लाभ देतील. **सल्ला :** तुमचे नाते समजून घेण्याचा प्रयत्न करा. तपकिरी रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या भावनांकडे लक्ष द्या.





**■ सिंह** (म, ट)
अतिरिक्त गरजांसाठी पैसे मिळू शकणार नाहीत. पण नवीन ठिकाणी भेट द्याल. **सल्ला :** तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवा आणि व्यावहारिक व्हा. पक्षी आणि प्राण्यांना खायला द्या आणि गरजू लोकांना मदत करा. तुमच्या लोभाकडे लक्ष द्या.





**■ कन्या** (प, ठ, ण)
तुम्ही तुमच्या चांगल्या कामासाठी चांगले नाव कमवाल आणि प्रशंसा तुमच्या कामाची गुणवत्ता सुधारेल. **सल्ला :** आपल्या नातेवाईकांना कमी लेखू नका. ध्यानामुळे निर्णय घेण्यास मदत होईल. तुमच्या वैश्विक ऊर्जेकडे लक्ष द्या.




**■ तुळ** (र, ट)
तुमचे काही नातेवाईक किंवा मित्र तुमच्या आर्थिक समस्यांमध्ये मदत करतील. **सल्ला :** शहाणपणाने बोला आणि सहनशील होण्याचा प्रयत्न करा. हिरवा रंग वापरा आणि हिरव्या भाज्या खा. आपल्या सामर्थ्याकडे लक्ष द्या.





**■ वृश्चिक** (न, य)
तुमचे काम वेळेत पूर्ण करू शकणार नाही लोक सहकार्य करतील. **सल्ला :** तुमच्या प्रवृत्तीवर विश्वास ठेवा आणि तुमच्या सहाव्या इंद्रियांचे अनुसरण करा. जुन्या नातेवाईकांना भेट द्या. कोणत्याही मंदिरात जा. तुमच्या प्रेमाकडे आणि काळजीकडे लक्ष द्या.





**■ धनु** (भ, ड, फ, ट)
ज्याला जास्त मानत नाही अशी व्यक्ती खूप मोठ्या गोष्टींमध्ये मदत करेल. काही आश्चर्ये आहेत. **सल्ला :** थोडा वेळ आध्यात्मिक वाचनाला द्या. गुंतवणुकीसाठी वेळ चांगला आहे त्यावर लक्ष केंद्रित करा. तुमच्या भ्रमाकडे लक्ष द्या.




**■ मकर** (ख, ज)
काही अनियोजित काम तुम्हाला विलक्षण परिणाम देईल. स्थिरता तुमच्या वाटेवर आहे. **सल्ला :** गट तुमच्यासाठी कोणत्याही व्यक्तीपेक्षा मोठा आहे. कोणत्याही बाबतीत भागीदारी करू नका. तुमच्या आर्थिक स्थितीकडे लक्ष द्या.




**■ कुंभ** (ग, स, श)
तुम्ही तुमचे यश साजरे कराल. तुमच्या फायद्यासाठी काही प्रसिद्ध व्यक्ती तुमच्या संपर्कात येतील. **सल्ला :** नवीन आणि जुन्या संबंधांना सहकार्य करा कोणावरही पुरेसा विश्वास ठेवू नका. तुमच्या विचारांकडे लक्ष द्या.




**■ मीन** (द, च, झ)
निराशेचा सामना करावा लागेल. काही न सुटलेल्या समस्या तुम्हाला तुमच्या दिनचर्येत त्रास देतील. **सल्ला :** प्रतिकूल परिस्थितीकडे लक्ष देऊ नका. शुभेच्छुकांसाठी काही वेषभूषा लेख ठेवा. जेवण आणि झोप याकडे लक्ष द्या.

# एमडी ड्रग्सची तस्करी करणाऱ्याला मुलुंडमध्ये अटक

■ **होम टाइम्स टीम**

मुलुंड पोलीस ठाण्याच्या हद्दीत एमडी ड्रग्सची तस्करी करणाऱ्या इसमाला मुलुंड पोलिसांनी अटक केली आहे. मोहम्मद तोहिफ साधत शेख असे अटक केलेल्या इसमाचे नाव असून मुलुंडमधील वसंत ऑस्कर परिसरात ही कारवाई करण्यात आली.

भांडुपमधील गुन्ह्याचा आलेख वाढणारा आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी येथे झालेल्या खुनानंतर पोलीस आणखी सतर्क झाले आहेत. परिमंडळ ७ मधील सर्वच पोलीस ठाण्यांना सतर्कतेचा इशारा दिलेला आहे. त्याच पार्श्वभूमीवर मुलुंड पोलीस ठाण्याच्या हद्दीत देखील अमली पदार्थांची विक्री आणि सेवन करणाऱ्या ठिकाणांवर पोलिसांनी आता कडक नजर ठेवण्यास सुरुवात केली आहे. खबऱ्यांच्या माध्यमातून ज्या ठिकाणी अमली पदार्थांचे रॅकेट मिळेल त्या ठिकाणी पोलिसांचे धाडसत्र सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणजे मुलुंड पोलिसांना वसंत ऑस्कर परिसरामध्ये एका इसमाकडे अमली पदार्थ विक्री करण्यासाठी उपलब्ध असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचून या परिसरातून मोहम्मद अली शेख या २९ वर्षे नामक तरुणाला ताब्यात घेतले. जागेवरच त्याची झडती घेतली असता त्याच्या खिशातून २० ग्रॅम वजनाच्या गोळ्या आढळून आल्या. या गोळ्यांबाबत अधिक चौकशी केली असता त्या एम डी च्या असल्याचे सकोर आले. या गोळ्यांची किंमत अंदाजे दोन लाख रुपये इतकी सांगितली जाते. यानंतर त्याला अमली पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत अटक करण्यात आली. मोहम्मद शेख याच्याकडे हे पदार्थ कोठून आले याचा शोध सध्या मुलुंड पोलीस घेत आहेत.



# नीलम नगरात घरफोडी, दागिने आणि रोकडची चोरी

## मुलुंडमधील नागरिकांना चोरांची दहशत

■ **होम टाइम्स टीम**

मुलुंडमधील नीलम नगरात घरफोडी झाल्याची घटना घडली आहे. अज्ञात चोरट्यांनी बंद घरात घुसून कपाटातील दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली आहे. या घटनेमुळे लोकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले असून त्यांच्याकडून पोलीस गस्त वाढविण्याची मागणी करण्यात आली आहे.

नीलम नगर परिसरात राहणारे राहणे कुटुंबीय गावी गेले होते.१९ नोव्हेंबर रोजी त्यांचा भाऊ संतोष कुमार याला त्यांच्या शेजाऱ्यांनी फोनवरून कळवले की राणे यांच्या घराचा दरवाजा उघडा आहे. त्यानंतर संतोष कुमार यांनी मुलुंड मधील नीलम नगर येथील इमारतीत जाऊन त्यांच्या घराची पाहणी केली असता त्यांच्या घराचा दरवाजा उघडलेल्या अवस्थेत दिसला. घरातील सामान पसरलेल्या अवस्थेत होते. कपाट जबरदस्तीने उघडलेले दिसत होते. कपाटातील लॉकर मधील दागिने आणि रोकड मिळून ७५ हजाराचा ऐवज लंपास झाला होता. यानंतर त्यांनी नवघर पोलीस ठाण्यात जाऊन या घरफोडिबाबत गुन्हा दाखल केला. पोलीस अधिक तपास करता आहेत.

# मंदिरातील मूर्तीची चोरी करणाऱ्या चोराला केले जेरबंद

## मुलुंड पोलिसांची दमदार कामगिरी

■ **होम टाइम्स टीम**

मुलुंडमध्ये चोरट्यांनी मंदिरात चोरी केल्याची धक्कादायक घटना घडली. चोरट्यांनी मंदिरातील एक लाख ९० हजार रुपयांची मूर्ती आणि चांदीचा मुलामा असलेले मूर्तीचे वस्त्र चोरी केले. या घटनेवरून चोरट्यांच्या तावडीतून मंदिरे देखील सुटलेली नाहीत असे दिसते. मात्र मुलुंड पोलिसांनी अवघ्या सहा तासात चोराला अटक करून चोरीला गेलेली मूर्ती आणि इतर ऐवज जप्त केला.

मुलुंड मधील पीके रोडवरील दीपक गृह मंदिर हे मुलुंड मधील प्रसिद्ध मंदिरांपैकी एक आहे. या मंदिरामध्ये पंचधातूची मूर्ती बसविण्यात आली आहे. यासोबतच मार्बलच्या दोन मुर्त्या देखील आहेत. २२ नोव्हेंबर रोजी ९:३० वाजता नेहमीप्रमाणे मंदिर बंद झाले. दुसऱ्यादिवशी पहाटे ५:३० वाजता मंदिर उघडण्यात आले. त्यावेळी मंदिराच्या पुजाऱ्यांच्या लक्षात आले की, मंदिराचा टाळा तोडलेला होता. त्यांनी आत जाऊन पाहिले असता मंदिरातील पंचधातूची मूर्ती चोरीला गेली होती. तसेच दोन मार्बलच्या दोन्ही मुर्त्यांवर असलेल्या चांदीच्या मुलाम्याचे वस्त्र देखील गायब होते. एकूण एक लाख ९० हजार रुपयांचे साहित्य हे या मंदिरातून चोरी करण्यात आले. या संदर्भात मंदिराच्या व्यवस्थापकांनी मुलुंड पोलीस ठाण्यात या संदर्भात देवाची मूर्ती चोरीला गेल्याची तक्रार दाखल केली

असता चोरांना अटक करण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर होते. त्यामुळे पोलिसांनी मंदिर परिसरातील सीसीटीव्ही तपासले असता त्यात ज्या दिवशी चोरी झाली त्यावेळी मंदिरच्या शेजारी एक मिनी टेम्पो उभा असल्याचे पोलिसांना दिसले. पोलिसांनी त्या टेम्पोचा शोध घेतला असता तो भिवंडी येथील असल्याची माहिती समोर आली. लागलीच वेळ न जाऊ देता पोलिसांनी भिवंडीत जाऊन आणखी शोध घेतला असता त्या वेळेत हा टेम्पो श्याम श्रीराम जलालु वय ४४ वर्षे , राहणार सोनाळे गाव, भिवंडी याच्या ताब्यात होता अशी माहिती मिळाली. पोलिसांनी त्याला त्याच्या घरातून अटक केली आणि त्याच्या ताब्यात असलेली मूर्ती, आणि इतर ऐवज व गुन्ह्यात वापरलेला टेम्पो जप्त केला. पोलिसांनी अवघ्या ६ तासात या गुन्ह्याची उकल केली.



CALL CENTER
**022 66211333**

E-MAIL ID
**customerservice@homenet.net**

FACEBOOK MESSENGER
**HomeNet / @homenet.net**

**Facebook Messenger Scan Code**: To get in touch, simply scan a code using the Messenger app.

Home Net

# HOME NET
**www.homenet.net**

WOW!

DOUBLE MAZZA!! uploads & downloads at same speed, since 2010
now @ ₹194/-*

Pay For 6 Months & Get Additional 7 Months Free

67 OFFER

## TRULY UNLIMITED SPEED PLANS

| PLAN NAME | 30 DAYS RATE | | 390 DAYS |
|---|---|---|---|
| 20 Mbps Unlimited | 500/- | NOW 231/-* | 3000/- |
| 30 Mbps Unlimited | 600/- | NOW 276/-* | 3600/- |
| 40 Mbps Unlimited | 720/- | NOW 332/-* | 4320/- |
| 50 Mbps Unlimited | 850/- | NOW 392/-* | 5100/- |
| 60 Mbps Unlimited | 985/- | NOW 455/-* | 5910/- |

## UNLIMITED POWER PLANS

| PLAN NAME | DATA(GB) | SPEED AFTER DC | 30 DAYS RATE | | 390 DAYS |
|---|---|---|---|---|---|
| 40 Mbps till Allotted Data | 250 | 20 Mbps | 600/- | NOW 277/-* | 3600/- |
| 60 Mbps till Allotted Data | 500 | 30 Mbps | 750/- | NOW 346/-* | 4500/- |

UPLOAD OR DOWNLOAD @SAME SPEED

99% UPTIME

- Affordable Rates
- Super speed Upto 100 mbps
- Customer support Android / IOS app
- Online Payments
- Customer care 9 am - 12 midnight

67 OFFER

## NEWLY LAUNCHED - FIBER TO THE HOME TECHNOLOGY

# HOME FIBER
powered by HomeNet

UNLOCK YOUR SUPERPOWER

## INTRODUCTORY HOME FIBER PACKS

UPGRADE YOUR EXISTING HOME NET TO
NEW FIBERNET EXPERIENCE WITH
ZERO INSTALLATION COST **

For New Customers installation charges of Rs.500/-* applicable

## HOME FIBER TRULY UNLIMITED SPEED PACKS

| PACK NAME | DATA(GB) | SPEED AFTER DC | EFFECTIVE MONTHLY RATE | 360 DAYS |
|---|---|---|---|---|
| 35 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 337/-* | 4040/- |
| 50 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 421/-* | 5050/- |
| 75 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 505/-* | 6060/- |
| 100 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 589/-* | 7070/- |

Many more Speed Pack options available up to 500 Mbps

** offer available only at the FTTH G / EPON Ready Building

TO AVAIL THIS **INTRODUCTORY OFFER IN YOUR SOCIETY** PLEASE COME TO US WITH A MINIMUM GROUP OF **15 CONNECTIONS**

- SYMMETRIC SPEED
- SUPER SPEED PACK UP TO 500MBPS
- EASY LOCAL APPROACH FOR ISSUE RESOLUTION
- FASTER VISITS FOR TECHNICAL SOLUTIONS
- NO VISIT CHARGES FOR ISSUES & COMPLAINTS

Customer Portal **login.homenet.net**
Customer Service Mobile App **Log2Space - HomeNet**

Download on the App Store | GET IT ON Google Play

FOR NEW CONNECTIONS OR QUERIES CALL

# Call - 75067 96562, 88790 00724, 88790 00720, 88794 47839

**MULUND** - A / 16, Gaurav Annex, R.R.T Road, Mulund (W), Mumbai - 400 080. Tel.: 022 662 11 333

MALAD • COLABA • VASHI • NERUL • THANE • AIROLI • ASANGAON • VASIND

*conditions apply

Printer , Publisher & Owner : **Hemanshu Girish Kothari** & Printed at Dangat Media Pvt. Ltd, Plot No.22, Digha MIDC, Vishnu Nagar, TTC Industrial Area, Digha, Navi Mumbai. Published at G/4, Landmark Appartment, Devidayal Cross Road, Mulund (W), Mumbai - 80.**Home Times** (Office): - 6th Floor, Flora Point, S.N. Road, Near Mulund Court, Mulund (W), Mumbai-80. **Editor : Hemanshu Girish Kothari** ● **RNI No.: MAHMAR/2016/66872**